# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## परिपत्रक

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

**विषय : – शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर जमा केलेले स्थलांतर दाखला (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.) जमा करणेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम. एम.ए. (भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी,) एम.ए. (सामाजिक शास्त्रे : इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी विविध अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर केलेले आहेत. उपरोक्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेश अर्जासोबत पात्रतेसाठी आवश्यक असणारे स्थलांतर दाखला (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.) संबंधित वि[illegible]याची गुणपत्रके व शेवटची जी परीक्षा दिली त्याचे गुणपत्रक, ए.बी.सी. डी. ई. बी. आयडी इ. कागदपत्रे सादर करतात.

उपरोक्त अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची पात्रता व तदअनुषंगिक कार्यवाही या केंद्रामार्फत सुरू असून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे प्राथमिक छाननी करण्यात येवून त्यांच्या पात्रतेची (Provisional and Confirm) कार्यवाही केलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी सदर कागदपत्रांची पूर्तता अद्यापि केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांची पात्रता तात्पुरती (Provisional) केलेली आहे. प्रवेशित विद्यार्थी प्रवेशप्रक्रियेबरोबर स्थलांतर दाखला (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.) व इतर अनुषंगिक कागदपत्रे सादर करत नाहीत. सदर विद्यार्थ्यांकडून कागदपत्रांची पूर्तता तात्काळ होणे आवश्यक आहे. यामधील काही विद्यार्थी हे स्थलांतर दाखला (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.), दुहेरी पदवी अर्ज, ए.बी.सी. आयडी व डी.ई.बी. आयडी इ. बाबी आपआपल्या अभ्यासकेंद्रावर सादर करतात. तसेच काही विद्यार्थी प्रवेश अर्जासोबत सदरची कागदपत्रे सादर करतात. काही अभ्यासकेंद्रे विद्यार्थ्यांचे अर्जासोबत असलेले (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.) व इतर अनुषंगिक कागदपत्रे काढून घेवून ते एकत्रितरित्या या केंद्राकडे प्रवेशप्रक्रिया झाल्यानंतर स्वतंत्रपणे प्रवेशप्रक्रिया व सत्र समाप्तीनंतर पाठवत असतात.

तरी आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येते की,

१) ज्या विद्यार्थ्यांचे स्थलांतर दाखला (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.), दुहेरी पदवी अर्ज इ. बाबी ज्या आपल्या अभ्यासकेंद्राकडे विद्यार्थ्यांनी जमा केले आहेत ते तात्काळ विषयनिहाय यादी करून या केंद्राकडे तात्काळ पाठवावे जेणेकरून सदर विद्यार्थ्यांची पात्रतेची अनुषंगिक पुढील कार्यवाही करता येईल.

२) तसेच ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशअर्जासोबत उपरोक्त कागदपत्रे सादर केलेली नाहीत अशा विद्यार्थ्यांना सदरची बाब प्रवेशाची पात्रता होणेच्या अनुषंगाने अंत्यत महत्वाची असल्याचे ती त्यांच्या निदर्शनास आणावी. तसे याबाबत अवगत करावे.

३) या शैक्षणिक वर्षापासून डी.ई.बी. आयडी असल्याशिवाय प्रवेश अंतिम होणार नाही असे आपणास विदित आहे. त्यानुसार आपल्या अभ्यासकेंद्रावरील काही विद्यार्थ्यांचे ए.बी.सी. आयडी व डी.ई.बी. आयडी सादर करणेबाबत यापूर्वी सूचित केले होते अशा विद्यार्थ्यांनाही सदरची पूर्तता करणेबाबत अवगत करावे. तसेच आपआपल्या केंद्राच्या विद्यार्थ्यांचे ए.बी.सी. आयडी व डी.ई.बी. आयडी माहिती आपल्या केंद्रावर अद्यावत ठेवावी.

३) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची पात्रता व तदअनुषंगिक कार्यवाही या केंद्रामार्फत सुरू असून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे प्राथमिक छाननी करण्यात येवून त्यांच्या पात्रतेची (Provisional and Confirm) ठेवणेत येत आहे. तरी सदरची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर Distance Education Link ठेवण्यात येत असून ती यादी ठेवल्यानंतर आपल्या केंद्रावरील संबंधित सर्व विद्यार्थ्यांना सदरची पूर्तता करणेबाबत अवगत करावे.

Shinde

उपकुलसचिव

जा.क्र.शिवाजी वि./सीडीओई/197/२०२५-२०२६
दिनाकं :०६/११/२०२५

प्रति,

१) मा.अभ्यासकेद्र प्रमुख/समन्वयक,
सर्व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण अभ्यासकेंद्रे, कोल्हापूर, सांगली व सातारा.

प्रत : -

१) विभागीय समन्वयक, विभागीय केंद्र, सांगली, सातारा, कोल्हापूर.
२) सर्व संबंधित मेंटॅार, शिक्षक, प्रशासकीय सेवक

आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व अभ्यासकेद्रावर सदरची बाब तात्काळ निदर्शनास आणून पाठपुरावा करावा. तसेच मेंटॉर यांनी आपणास दिलेल्या अभ्यासकेंद्रावर समन्वय साधनू त्याची पूर्तता करणेबाबत पाठपुरावा करावा.

३) सर्व संबंधित हंगामी सहाय्यक प्राध्यापक
४) सर्व संबंधित प्रशासकीय सेवक

आपल्या अभ्यासक्रमांचे विद्यार्थ्यांचे जमा होणारे टी.सी., एम.सी., दुहेरी पदवी अर्ज योग्य त्या नोंदी सबंधित सेवक यांनी घेवून त्या तपासून त्यांच्या पात्रतेची पुढील अनुषंगिक कार्यवाही करावी. संबंधित सेवक यानी आपआपल्या विषयांच्या याद्या विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी अद्यावत ठेवून त्या याद्या संबंधित विषयाचे शिक्षक यांच्याकडे द्याव्यात. तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांना विविध माध्यामातून (एस.एम.एस., व्हॉटसॲप पॅनेल, ई-मेल, व्हॉटसग्रूप माध्यमातून संपर्क साधून सर्व संबंधि पात्रता पूर्ण करणेबाबत अवगत